**क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१८/पो.नि.(वाह.)/१८/२०१८**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- २७/०४/२०१८.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. ११/०४/२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त

## आदेश

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी प्रशासकीय कारणास्तव जनहितार्थ विशेष बाब म्हणून पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक (वाह.) यांनी केलेल्या **विनंतीचा सांगोपांग विचार करुन** खालीलप्रमाणे पदस्थापनेचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक (वाह.) यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | रामराव विठ्ठलराव वावरे | बि.सं. औरंगाबाद परिक्षेत्र | विनंती अमान्य |
| २ | परशुराम पांडुरंग निकम | बि.सं. नागपूर परिक्षेत्र | रा.रा.पो.बल गट क्र. ५, दौंड (येथील अधिकारी यांचे सेवानिवृत्तीनंतर) |
| ३ | अशोक मारुती ईप्पर | गट क्र. ०३ जालना | बि.सं. नांदेड परिक्षेत्र, नांदेड |
| ४ | गोरक्ष उध्दवराव बेंद्रे | बि.सं. कोल्हापूर परिक्षेत्र | विनंती अमान्य |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत, आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त पोलीस निरीक्षकांना व्यक्तिश: अदा करुन, त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त पोलीस निरीक्षकांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या पोलीस निरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त

केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक ३१/०५/२०१८ पुर्वी (कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षकांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोलीस निरीक्षक (वाह) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या ठिकाणच्या पोलीस घटक कार्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस निरीक्षक या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे व desk३a.dgoffice@mahapolice.gov.in या ई-मेल वर कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस निरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा पोलीस निरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस निरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

६. पदस्थापनेच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

७. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र/ नागपूर परिक्षेत्र/ कोल्हापूर परिक्षेत्र/ नांदेड परिक्षेत्र
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ०३ जालना/ गट क्र. ५ दौंड

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर (सस्नेह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई
(सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, १६, ३६ व ४०.